महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४३ वा दिनांक : ०२/११/२०२४ वार : शनिवार

## आपसात चर्चा करुन एकाचे नाव निश्चित करा : मनोज जरांगे



**जालना** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा, मुस्लिम आणि दलित समीकरण एकत्र करून निवडणुकीला सामोरे जाण्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मात्र यातच एकाच मतदारसंघात मराठा आंदोलनाच्या माध्यमातून अनेक उमेदवार रिंगणात उतरले आहेत. या उमेदवारांनी अपक्ष म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यातील एकाच उमेदवाराला एका मतदारसंघात मनोज जरांगे पाटील पाठिंबा देणार आहेत. तोच पक्षाचा अंतिम उमेदवार असेल. मात्र याबाबत निर्णय घेण्यासाठी सर्व इच्छुकांनी आपसात चर्चा करून एक नाव अंतिम करण्याचा सल्ला मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे मुस्लिम धर्मगुरू आणि दलित समाजातील ज्येष्ठ नेत्यांची एकत्रित बैठक बोलावली होती. या बैठकीत मुस्लिम, मराठा आणि दलित यांनी एकत्र निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्णय घेतला. यात जे मतदारसंघांमध्ये राखीव आहेत त्या मतदारसंघात दलित समाजाच्या उमेदवाराला पाठिंबा दिला जाणार आहे. तर इतर ठिकाणी मराठा समाजाचे उमेदवार असतील. यासोबतच इतर छोट्या मोठ्या सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र घेणार असल्याचे मनोज जरांगे यांनी जाहीर केले आहे. त्यातच आता एका मतदारसंघात अनेक इच्छुक उमेदवार आपण मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने निवडणुकीला सामोरे जात असल्याचा दावा करत आहेत. या सर्व उमेदवारांनी एकत्र चर्चा करून एका जण अंतिम करण्याचे आवाहन मनोज जरांगे यांनी केले आहे.

या संदर्भात मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले की, विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या आणि उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या मराठा बांधवांनी तातडीने एकत्र बसून बैठक घ्यावी. या बैठकीत सर्वांनी मिळून एक उमेदवार ठरवावा. आपल्यासाठी ही चांगली संधी आलेली आहे. ओढाताणीच्या नादात ही संधी घालू नका, असे आवाहन देखील त्यांनी केले.

## संजय राऊत यांचा रश्मी शुक्ला यांच्यावर गंभीर आरोप



**मुंबई** : राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यावर उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अनेक गंभीर आरोप केले आहेत. इतकेच नाही तर त्यांच्या माध्यमातून आमचे फोन आजही टॅप केले जात असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. रश्मी शुक्ला यांना हटवण्याची मागणी आम्ही निवडणूक आचारसंहिता लागण्याच्या आधीपासून केली आहे. मात्र, तरी देखील निर्णय घेतला जात नाही. रश्मी शुक्ला या आमच्या कार्यकर्त्यांवर आणि पदाधिकाऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल करून दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप देखील संजय राऊत यांनी केला.

आचारसंहिता लागण्याच्या आदल्या रात्रीपर्यंत भाजप, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपापल्या उमेदवारांकडे पंधरा ते वीस कोटी रुपये फोहचवले आहेत. आणि हे सर्व पोलिस बंदोबस्तात झाले आहे. राज्यात हेलिकॉप्टरने पैसे जातात. त्यांना कोण अडवणार? असा प्रश्न राऊत त्यांनी उपस्थित केला. जे काही दोन पाच कोटी रुपये पकडले जात आहेत, ते किरकोळ असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे. राज्यात आता पोलिसांची वाहने देखील तपासली जाणार असल्याचे वृत्त समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राऊत यांनी हा आरोप केला आहे.

सध्या निवडणुकीच्या आचारसंहिता सुरू आहे. अशावेळी दीपोत्सवाच्या माध्यमातून राजकीय प्रचार होत असेल तर त्याला विरोध करण्यात काहीही चुकीचे नसल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. मनसेच्या वतीने आयोजित दिपोत्सवाच्या माध्यमातून त्या मतदारसंघांमध्ये नेत्यांची भाषणे होत आहेत. त्यामुळे त्यावर आक्षेप असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

ज्या पक्षाकडून शिवसेनेची मते कापले जातील, त्यांना मदत करायची हे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आणि भाजपचे धोरण असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. म्हणजेच महाराष्ट्राच्या विरोधामध्ये जे पक्ष असतील त्यांना मदत करणे, हे त्यांचे राष्ट्रीय धोरण असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

बोगस आधार कार्डच्या माध्यमातून हजारो बोगस नावे मतदार यादीमध्ये घुसवली जात आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून हे भाजपचे सुरू असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे. हा भाजप आणि त्यांचा आयटीसेलचा एक उपक्रम असतो. मात्र हे अत्यंत गंभीर आहे. याबाबत आम्ही वारंवार तक्रारी केल्याचेही राऊत यांनी म्हटले आहे.

## काही ठिकाणी डबल AB फॉर्म गेले : अजित पवार

**पुणे** : काही ठिकाणी डबल एबी फॉर्म दिल्याचे गोष्ट खरी आहे. याबाबत आम्ही वर्षा बंगल्यावर रात्री तीन-चार तास चर्चा करुन कुठे कुठे एबी फॉर्म डबल दिले, याबाबत माहिती घेतली. राजकीय पक्षाच्या लोकांनी अपक्ष म्हणून फॉर्म भरले आहेत. काहींनी पक्षाच्या वतीने फॉर्म भरले पण त्यांचा एबी फॉर्म नसल्यामुळे तो बाद झाला आहे. ज्यांनी माघार घ्यायची आहे, त्यांना तीन तारखेला फोन करुन फॉर्म मागे घ्यायला सांगणार असल्याचे अजित पवार म्हणाले.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून आता राजकीय पक्षांकडून प्रचाराची तयारी सुरू आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे पाच नोव्हेंबरपासून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात करणार आहेत. विविध मतदारसंघात दर दोन तासांच्या अंतराने सभा घेणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

नवाब मलिक यांना पाठिंबा देणार नसल्याच्या भाजपच्या भूमिकेवर बोलणे अजित पवारांनी टाळले. भाजपने पहिल्यापासून त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. त्यांचे काय मत आहे, हे देखील माहीत आहे, असे ते म्हणाले

राष्ट्रवादी पळवली गेली, सत्तेसाठी काही लोकांनी पक्षाचे नाव आणि चिन्ह पळवले, अशी टीका शरद पवार यांनी केली होती. या टीकेलाही अजित पवार यांनी उत्तर दिले आहे. पवार साहेब मोठे आहेत. त्यांनी काय बोलावे हा त्यांचा अधिकार आहे. निवडणूक आयोगाला न्याय देण्याचा अधिकार आहे. निवडणूक आयोगाने सगळ्या गोष्टी पाहल्या. जास्तीत जास्त आमदार आमच्यासोबत असल्यामुळे घड्याळ चिन्ह आणि नाव आम्हाला दिले. राष्ट्रवादी वाढवण्यासाठी आमचाही खारीचा वाटा आहे. भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आम्ही सर्व १९९९ पासून पक्षात होतो. आम्ही सगळ्यांनी मिळून तो निर्णय घेतला होता, असेही अजित पवार म्हणाले.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ. दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ. कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०२ नोव्हेंबर २०२४


## एकनाथ शिंदे यांनी परवानगी दिली तर मनसेनेबरोबर युती करू : देवेंद्र फडणवीस





**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा युतीमध्ये समावेश होण्याबाबत मोठे विधान केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परवानगी दिली तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबरोबर काही जागांवर युती होऊ शकते, असे मत फडणवीस यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे आता माहीम विधानसभा मतदारसंघावर सर्वांचेच लक्ष लागले आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मनसेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बिनशर्थ पाठिंबा दिला होता. मात्र विधानसभा निवडणुकीत स्वतंत्र लढण्याचा निर्णय राज ठाकरे यांनी घेतला आहे. इतकेच नाही तर राज ठाकरे यांनी अनेक मतदारसंघ उमेदवार देखील घोषित केले आहेत. मात्र विधानसभेमध्ये मनसे आणि युतीमध्ये समावेश होण्याची शक्यता अजूनही वर्तवली जात आहे. त्यात आता देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यामुळे या घटना घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज ठाकरे हे आमचे चांगले मित्र असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांनी आम्हाला बिनशर्थ पाठिंबा दिला होता. मात्र या निवडणुकीत त्यांनी वेगळी भूमिका घेतली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत आम्ही समोरासमोर लढत आहोत. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संमती दिली तर एक दोन ठिकाणी त्यांना मदत करणे सोपे होईल, त्यामुळे ते युतीचा एक भाग होऊ शकतात. त्यासाठी फडणवीस यांनी शिवडी सारख्या जागेचे उदाहरण देखील दिले.

माहीम विधानसभा मतदारसंघात राज ठाकरे यांचे सुपुत्र अमित ठाकरे हे निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यांच्या विरोधात एकनाथ शिंदे यांचे सदा सरवणकर हे विद्यमान आमदार रिंगणात आहेत. तर उद्धव ठाकरे यांनी देखील इथे उमेदवार दिला आहे. त्यामुळे या मतदारसंघात तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यात सदा सरवणकर यांनी माघार घेतल्यास अमित ठाकरे यांचा मार्ग सुकर होऊ शकतो. त्यामुळे या घटना घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## अरविंद सावंतांच्या विधानावर संजय शिरसाट संतापले




**छत्रपती संभाजीनगर :** ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी शायना एनसी यांचा उल्लेख कथितपणे माल असा केल्याचा शायना एनसी यांनी दावा केला आहे. अरविंद सावंत यांच्या या अपशब्दावरून शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी संताप व्यक्त केला आहे. शायना एनसी यांना अरविंद सावंत इम्पोर्टेड माल म्हणतात, हीच का त्यांची महिलांबाबतची भाषा?, महिलांचा हाच का सन्मान? असे संजय शिरसाट म्हणाले.

अरविंद सावंत यांनी शायना एनसी यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याने भाजप आणि शिंदे गटातून संताप व्यक्त केला जात आहे. अरविंद सावंत शायना एनसी यांना इम्पोर्टेड माल म्हणतात, ही यांची भाषा आहे. हेच त्यांचे संस्कार आहेत. या लोकांना तारतम्य राहिले नाही. अशी भाषा उद्धव साहेब सहन करतात, तर आम्ही काय बोलणार? असे म्हणत संजय शिरसाट यांनी अरविंद सावंत यांच्यावर संताप व्यक्त केला.

संजय राऊत चेक नाक्यावर उभा होता का? पुढे बोलताना संजय शिरसाट यांनी संजय राऊत यांच्यावरही निशाणा साधला. रश्मी शुक्ला डीजी झाल्यापासून संजय राऊतांना त्यांचा तिरस्कार आहे. भीती वाटत असेल तर फोनवर असे काही बोलू नका की ज्यामुळे भीती वाटेल. तुमचे फोन कोण कशाला टॅपिंग करणार? तुमच्यासारख्यांचे फोन टॅपिंग करायला कुणालाही वेळ नाही.

सध्या ठाकरे गटात महिलांचा अवमान करण्याचा पॅटर्न सुरू आहे, अशी टीका संजय शिरसाट यांनी केली. आम्ही कुणाला किती पैसे पोहोचवतोय हे पाहायला संजय राऊत काय चेक नाक्यावर उभा होता का? आरोप करणे हे महामूर्खपणाचे लक्षण आहे. यांना पैसे, टक्केवारी आणि ब्लॅकमेलिंग हेच शब्द माहीत आहेत, असा घणाघातही त्यांनी केला.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## एकाच नावाचे एकापेक्षा जास्त उमेदवार नशीब आजमावत असल्याने मतदारसंघात लढती रंजक

**मुंबई :** महाराष्ट्रात एकाच टप्प्यातील विधानसभा निवडणुकीसाठी ८ हजारांहून अधिक जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते, त्यात ७,९९४ उमेदवारांचे उमेदवारी अर्ज छाननीनंतर योग्य असल्याचे आढळून आले. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीत अनेक जागांवर चुरशीच्या लढती होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मोठे चेहरे तर काही ठिकाणी खास राजकीय पक्ष पणाला लागले आहेत. तर काही जागांवर एकाच नावाचे एकापेक्षा जास्त उमेदवार आपले नशीब आजमावत असल्याने ही लढत रंजक बनली आहे. अशा परिस्थितीत तत्सम उमेदवार उभे करणे हा निव्वळ योगायोग की, काही रणनीतीचा भाग आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच सर्वच राजकीय पक्षांनी आपापल्या निवडणूक प्रचाराला सुरुवात केली आहे. मात्र एकाच नावाचे अनेक उमेदवार अनेक जागांवर लढत असल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे.

पुणे जिल्ह्यातील पर्वती विधानसभा जागेवर भारतीय जनता पक्षाच्या माधुरी मिसाळ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अश्विनी कदम यांच्यात मुख्य लढत आहे. मात्र, अश्विनी नावाच्या तीन उमेदवार रिंगणात असून त्यात अश्विनी कदम नावाच्या दोन महिलांनीही उमेदवारी दाखल केली आहे. अश्विनी खैरनार आणि अश्विनी कदम या अपक्ष उमेदवार म्हणून रिंगणात आहेत, तर राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या वतीने वतीने अश्विनी कदम आव्हान देत आहेत.

जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर जागेवर एकाच नावाचे एकापेक्षा जास्त उमेदवार रिंगणात आहेत. येथे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून चंद्रकांत पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार रोहिणी एकनाथ खडसे यांच्याशी लढत आहे. याशिवाय दोन महिला उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. रोहिणी पंडित खडसे आणि रोहिणी गोकुळ खडसे अशी त्यांची नावे आहेत. या दोन महिला स्थानिकही नाहीत. एक वाशिम जिल्ह्यातील तर दुसरी महिला अकोल्याची आहे.

रोहिणी नावाच्या ३ उमेदवारांशिवाय चंद्रकांत पाटील नावाचे २ अपक्ष उमेदवारही येथून नशीब आजमावत आहेत. शिवसेनेकडून चंद्रकांत निंबा पाटील यांच्याशिवाय अन्य दोन चंद्रकांत पाटील अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. या जागेसाठी एकूण ४३ जणांनी अर्ज भरले, त्यापैकी ३६ जणांचे अर्ज योग्य आढळले. अशा स्थितीत २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतदानादरम्यान मतदारांना काळजीपूर्वक मतदान करावे लागणार आहे.

सांगली जिल्ह्यातील तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभेत मुख्य लढत राष्ट्रवादीच्या दोन गटांमध्ये आहे. राष्ट्रवादीचे संजय काका पाटील (अजित पवार) आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पाटील यांच्यात लढत आहे. मात्र येथे रोहित पाटील नावाच्या एकूण ३ वेगवेगळ्या उमेदवारांनीही अपक्ष अर्ज दाखल केले आहेत. रोहित रावसाहेब पाटील, रोहित राजगोंडा पाटील, रोहित राजेंद्र पाटील हे रिंगणात आहेत. याशिवाय संजय पाटील नावाच्या अपक्षानेही अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या जागेवर ४ रोहित पाटील आणि २ संजय पाटील यांच्यात अनोखी लढत पहायला मिळत आहे, मात्र मतदारांच्या नावाबाबत संभ्रम न ठेवता आपल्या आवडत्या उमेदवाराला मतदान करण्याचे खरे आव्हान आहे.

सांगलीच्या इस्लामपूर मतदारसंघात राष्ट्रवादीचे जयंत पाटील (शरद पवार) राष्ट्रवादीचे निशिकांत पाटील (अजित पवार) यांच्यात लढत आहे. शरद पवारांचे उमेदवार जयंत यांचे पूर्ण नाव जयंत राजाराम पाटील आहे. विशेष म्हणजे येथील दोन अपक्ष उमेदवारांचे पूर्ण नाव जयंत राजाराम पाटील आणि दुसऱ्याचे नाव जयंत रामचंद्र पाटील असे आहे. दोघेही अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत. अजित पवार यांच्यावतीने निशिकांत प्रकाश पाटील हे रिंगणात आहेत, तर निशिकांत प्रल्हाद पाटील आणि निशिकांत या समान नावाचे दोन उमेदवार अपक्ष म्हणून निवडणूक लढवत आहेत.

पुणे जिल्ह्यातील इंदापूर विधानसभेसाठी समान नावे असलेले अनेक उमेदवार रिंगणात आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून हर्षवर्धन पाटील हे राष्ट्रवादीचे (अजित पवार) दत्तात्रय भरणे यांच्याविरोधात निवडणूक लढवत आहेत. येथे हर्षवर्धन पाटील नावाच्या दोघांनी तर दत्तात्रय भरणे नावाच्या एका व्यक्तीने अर्ज दाखल केले आहेत. अशाप्रकारे इंदापूर जागेसाठी हर्षवर्धन पाटील यांच्या नावाने ३ आणि दत्तात्रय भरणे यांच्या नावाने २ जण रिंगणात आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली विधानसभा जागेवर एकूण ६ कदम (३ योगेश कदम आणि ३ संजय कदम) यांच्यात लढत आहे. शिवसेनेकडून योगेश कदम (शिंदे) आणि संजय कदम हे उद्धव ठाकरे गटाकडून निवडणूक लढवत आहेत. याशिवाय योगेश कदम आणि संजय कदम हे दोन अपक्ष उमेदवार म्हणून राजकीय पक्षांचे समीकरण बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत.

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव विधानसभेच्या जागेवर नामवंतांमध्ये लढत होत आहे. शिवसेनेचे महेश शिंदे (शिंदे) आणि राष्ट्रवादीचे शशिकांत शिंदे (शरद पवार) यांच्यात चुरशीची लढत आहे. या जागेवर शशिकांत शिंदे या तीन वेगवेगळ्या उमेदवारांनी अपक्ष अर्ज दाखल करून लढत रंजक बनवली आहे. शशिकांत शिंदे यांच्या नावाने अपक्ष उमेदवारांने अर्ज दाखल केला आहे. कोरेगाव मतदारसंघातून एकूण ४ महेश शिंदे आणि २ शशिकांत शिंदे रिंगणात आहेत. महेश या नावाबाबत येथे बराच गोंधळ आहे. महेश माधव शिंदे (अपक्ष), महेश संभाजीराजे शिंदे (शिवसेना), महेश संभाजी शिंदे आणि महेश सखाराम शिंदे यांच्यासह महेश माधव कांबळे हेही आव्हान देणार आहेत.

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड जागेवर जोरदार लढत आहे. भाजपने माजी मंत्री राम शिंदे यांना येथे उमेदवारी दिली आहे, तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाकडून रोहित पवार रिंगणात आहेत. रोहित हे प्रभावशाली शरद पवार कुटुंबातील आहेत. या ठिकाणी राम शिंदे आणि रोहित पवार नावाने २ जण अपक्ष म्हणून रिंगणात आहेत. अशा स्थितीत रोहित पवार या नावाने ३ आणि राम शिंदे नावाचे ३ उमेदवार मैदानात आपले नशीब आजमावत आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०२ नोव्हेंबर २०२४


# "स्मरणातली दिवाळी"


## डॉ.बाळासाहेब लिहिणार – मो. ९४२१२ ४५३०९




**सा**धारणतः १९९६- ९७ चे ते वर्ष असेल. औरंगाबाद शहरात लोक धूमधडाक्यात दिवाळी साजरी करत होते. फटाक्याची अतिषबाजी होत होती. मी एका उद्योगपतीच्या बंगल्यावर वॉचमेनची नोकरी करत होतो. उद्योगपतीच्या घरी दिवाळीच्या सणानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी लोक येत जात होते.

शुभेच्छा देणाऱ्यांच्या वातावरणात मी वाढलो नसल्यामुळे ते मला सगळे नवीनच होते.आमच्या घरची दिवाळी म्हणजे दिवाळीच्या दिवशी पुरणपोळी,खीर,त्याला जोड म्हणून तिखट सार, कुरडया आणि भजी करायचे. दिवाळीला तीन चार रुपयाचे लवंगी फटाके मिळायचे सोबत मिळालेल्या टिकल्या आम्ही फोडायचो.

अशी आमची दिवाळी एकाच दिवशी यायची आणि जायची सुद्धा. मामा तेव्हडा दिवाळीनिमित्त दिवाळी झाल्यावर भावबिजसाठी घ्यायला यायचा. तिथे दहा पंधरा दिवस राहायचो. परतीचे दिवस आले की, आईचे वडील म्हणजे माझे आजोबा आम्हा भावा बहिणीला नवीन कपडे घ्यायचे.तेच घालून आम्ही आमच्या गावी परत यायचो तोच दिवस आमचा दिवाळीचा.

दिवाळीच्या दिवशी फक्त गोडधोड खायचे त्या दिवशी नवीन कपडे घातलेच पाहिजे असा काही रिवाज नव्हता. इकडचे मात्र सगळे वातावरण मला नवीन होते.श्रीमंत लोकांची दिवाळी वेगळीच वाटत होती.लोक हातात कपडे, मिठाईचे बॉक्स घेऊन यायचे.त्याची देवघेव व्हायची.हे दिवाळीच्या तीन चार दिवस अगोदर पासून सुरू होते.

मी मिलिंद कॉलेजमध्ये (बी.ए.) पदवीचे शिक्षण घेत होतो.व रात्री वॉचमेनची नोकरी करत होतो. तशी ही नोकरी माझ्यासाठी खूप चांगली होती. दिवसा कॉलेज अन् रात्री वॉचमेनची नोकरी. साहेबांच्या बंगल्यावर आम्ही दोन जन काम करत होतो.एक दिवसा अन् रात्री मी. दिवसा नोकरी करणाऱ्याची मला खुप मनधरणी करावी लागायची. कारण तो मला फक्त रात्रीची duty करण्याची संधी द्यायचा.

दिवाळीचा काळ म्हणून तो मला म्हणाला आता तुझ्या कॉलेजला सुट्या आहेत, मला गावाकडे जायचे आहे.त्यामुळे दोन तीन दिवस मी काही येणार नाही.त्यामुळे तुलाच दिवसा अन् रात्रीही इथे थांबावे लागणार आहे. मला काही पर्याय नव्हता.मी हो म्हणालो अन् तो गावी गेला. दिवाळी सनोनिमित्त श्रीमंत घरचे वातावरण पाहून मला वेगळेच वाटत होते. बंगल्यावर उद्योगपतींची बायको, सून, मुलं सगळी एकदम हसून खेळून दिवाळी साजरी करत होती.

मी मात्र माझ्या कुटुंबापासून दूर होतो. दिवाळीच्या अधल्या दिवशी सगळे पाहुणे रावळे गेल्यावर बंगल्यासमोर खुर्चीवर बसलो व मला माझी आई, माझे वडील माझा भाऊ माझी बहीण अन् एकूण माझ्या गावातील सगळा परिसर माझ्या डोळ्यासमोर फिरत होता.मनातल्या मनात आपली दिवाळी अन् यांची दिवाळी याची मी तुलना करत होतो. हेही माणसं अन् आ पणही माणसं पण आपलं जगणं वेगळं अन् यांचं जगणं वेगळं का? असे अनेक प्रश्न मनात कल्लोळ माजवित होते.

खरं सांगू त्या रात्री मला झोप आलीच नव्हती. साहेबांकडे आलेल्या एका पाहुण्यांने माझ्या हातात दहा रू.देण्यासाठी हात पुढे केला, मला ते अजिबात आवडले नाही. मी त्यांना नाही म्हणून सांगितले. साहेब घे म्हटले पण मी नाही घेतले. शेवटी त्यांच्या घरात स्वयपांक करणाऱ्याच्या मुला ला मी ते घेवून देवून टाकले. मला ते पैसे भिक दिल्या सारखेच वाटत होते. त्यांनी दिलेली मिठाई देखील मला नाही घ्यावी वाटली. तो मिठाईचा डब्बा तिथेच पडून होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी माझ्यासाठी दिवाळीचा दिवस सुरू झाला होता. साहेबाना सांगितले, मी घरून जेवण करून येतो. तेव्हा साहेबांची हिम्मत झाली नाही तुला इथेच जेवण आहे म्हणायची. कारण रात्री त्यांनी पाहुण्यांनी देत असलेले दहा रुपये मी घेतले नव्हते हे पहिले होते.

मी रूमवर जावून सायकल लावली अन् सरळ गावची बस धरली. गावी जायला तेव्हा फक्त पाच रुपये लागायचे. बसमध्येही मनाची खूप घालमेल चालू होती. आई वडील भाऊ यांना या दिवशी भेटायची इच्छा झाली होती. आईने केलेले पुरण पोळीचे जेवण तिच्यासमोर बसून खायचे होते. गावचे कोणी मित्र भेटले तर त्यांना भेटा यचे होते.गावातील वातावरणात त्या काळापुरते का होईना रममाण व्हायचे होते.

तिकडे साहेबाना फक्त जेवण करून येतो म्हणून सांगितले होते म्हणून मनात सारखी घालमेल चालू होती.अशात माझे बस स्टँड कधी आले समजले सुद्धा नाही.बस स्टँड हून माझे गाव पाच ते सहा किलोमिटर दूर होते.तिथून किरायाची सायकल घेवून गावी निघालो. रस्ता माझ्या गावाकडचा असल्यामुळे मी वेगळ्याच दुनियेत मग्न झालो होतो. सायकलचे पायंडल जोरजोरात मारून कधी घर जवळ करील असे झाले होते.रात्रीची श्रीमंत लोकांची दिवाळी अन् आमच्या वाट्याला आलेलं अठराविश्व दारिद्र्य.मन कसं बैचन झालं होतं. डोळ्यासमोर दोन समाज दिसत होते एक अत्यंत श्रीमंत समाज आणि एक पिढ्यानपिढ्यापासून दारिद्र्य भोगत असलेलं समाज. एका कुटुंबात लेकरासाठी हजारो रू. खर्च करणारा समाज दिसत होता अन् एकीकडे आपल्या लेकरांच्या पोटाला अन्न मिळावं म्हणुन सतत ढोरा गूरा सारखा राबणारा समाज दिसत होता.

मन सारखं श्रीमंत आणि गरीब यांच्यात असलेली दरी याचा विचार करण्यात गुरफटलेले होतं. यात रस्ता कसा कटला आणि मी कधी घरी पोहोचलो हे समजले नाही. तसा जेव्हा मी घरी पोहोचलो, तेव्हा मी जो विचार करत होतो अगदी तसेच झाले. आई घरात नव्हती. दिवाळीचा स्वयंपाक करत नव्हती. माझ्या घरी दिवाळी आहे असे काहीच वातावरण नव्हते. आई वडील भाऊ हे सगळे घरात नाही म्हणून इकडे तिकडे पाहिले तर ते सगळे शेतात दिवाळीच्या दिवशी खुरपणीचे काम करत होते.

मी आई जवळ गेलो अन् म्हणालो आज दिवाळी आहे ना! मग तू काहीच करणार नाही का... आई हसली अन् म्हणाली अरे करुना, मला वाटलं तू काल काही आला नाही, नसल मिळाली तुला सुट्टी. म्हणून नाही करावे वाटले काही. आता आला तू तर करू संध्याकाळी. पण मी आईला सांगितले मला आता लगेच परत जायचे आहे, कारण मला duty आहे मी साहेबाना खोटे सांगितले. असं सांगितल्यावर आईचे हातपाय गळाले. आता याला काय करू, लगेच काय करून खाऊ घालू म्हणून तिची एकदम घालमेल सुरू झाली. माझ्या ते लक्षात आले. मी तिला म्हणालो काही विचार करू नको. माझ्या साहेबांकडे मला आज दिवाळीचे जेवण आहे. मी फक्त तुम्हाला दिवाळीचे भेटायला आलो बाकी काही नाही. पण सगळे सांगूनही आईचा जीव कासावीस झाला होता.

दिवाळीचा सण अन् पोरगं तसच चाललय म्हणून तिच्या डोळ्यात अश्रू तरळत होते.पण ती ते दिसू देत नव्हती.बिचारी तशीच शेतातून घरी आली काहीच शक्य नाही म्हणून तिने गव्हाची चपाती केली आणि मला त्यासोबत पाट्यावर मिरच्या ठेसून खायला दिली.

तेच खावून मी घरचा निरोप घेऊन परत निघालो.बंगल्यावर यायला संध्याकाळच झाली होती.साहेब जे बोलतील ते ऐकण्याची मी पूर्ण तयारी केली होती पण साहेब काहीच न बोलता माझ्याकडे पाहून फक्त म्हणाले आलास.पण माझं मन मला विचारत होतं यातून कधीतरी तुझी सुटका होईल का? कधीतरी तुझी पुढची पिढी तरी या श्रीमंत समाजाचं जगणं जगल का ? अनेक प्रश्न पडत गेले अन् मी वाट काढत गेलो.आज दिवाळीच्या दिवशी मी माझ्या बंगल्यात माझ्या बायकोसोबत, माझ्या मुलांसोबत किचनमध्ये गप्पा मारत बसलो होतो.

मी आता दिवाळी साजरी करत नसलो तरी ती माझ्या कायम स्मरणात असलेली दिवाळी कधीच विसरू शकणार नाही. त्यातच दादाला जावून एक वर्ष ही झाले. दादा गेले तेंव्हा पासून असा एक दिवस जात नाही की दादांच्या आठवणी जाग्या होत नाही.त्यातीलच ती स्मरणातली दिवाळी.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ०२ नोव्हेंबर २०२४

## मतदान ...

डॉ.आरिफ ताजुद्दीन शेख
उर्फ आता
मो. ७०२०२६८४७१

आता मतांची वाटणी
आता मतांचा गुणाकार
आता मतांचा भागाकार
आता मतांची वजाबाकी

आता मतांची पुन्हा गोळा बेरीज
आता शेवटी हिशोब लागेना
भाऊ ,दादा, तात्या, साहेब
आप्पा,ताई, नाना मेळ बसेना

आता म्हणे लागा कामाला
आता मतांचा मोल राखूया
आता विचार करू या
आता निष्ठावान निवडूया

आता मत देताना
दर्दी माणूस पाहूया
आता कर्तृत्ववान निष्ठावान
आता सुसंस्कृत निवडूया

आता गंमत अशी...
आता डझनभर पक्ष..
आता शेकडो इच्छुक...
आता क्षणभर वेळात

आता बटन दाबावं कोणतं
आता मत एकाला
आता गुलाल दुसऱ्यावर
आता सत्ता तिसऱ्याची

आता म्हणे ऐका कार्यकर्त्यांनो
पुरे झाले राजकारण...
आता घरंदाजपणा राखूया
अंतरात्मा म्हणेल त्यास
आता मतदान करूया..

# मुलीच्या प्रचारासाठी एकनाथ खडसे मैदानात



**जळगाव** : मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे हे आता निवडणूक प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत.

या मतदारसंघात आपली मुलगी रोहिणी खडसे यांचा प्रचंड मतांनी विजय होईल, असा विश्वास खडसे यांनी व्यक्त केला. तसेच राज्यांमध्ये महाविकास आघाडीचे सरकार येईल, असा दावा देखील त्यांनी केला आहे.

वास्तविक मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघ एकनाथ खडसे यांचा बालेकिल्ला मानला जात होता. त्यावेळी एकनाथ खडसे हे भारतीय जनता पक्षामध्ये होते.

त्यामुळे या मतदारसंघावर सलग विजयी होण्याचा विक्रम खडसे यांच्या नावावर आहे. मात्र २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत याच मतदारसंघात रोहिणी खडसे यांचा पराभव झाला होता. यावेळी देखील रोहिणी खडसे यांना चंद्रकांत पाटील यांचे आव्हान असणार आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाचा या निवडणुकीतील पहिला उमेदवार म्हणून चंद्रकांत पाटील यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. त्यामुळे या मतदारसंघाकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

राज्यामध्ये महागाई आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे राज्यातील जनता त्रस्त आहेत. राज्यातील जनता ही महाविकास आघाडीच्या बाजूने कौल देणार असल्याचा दावा देखील खडसे यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीत देखील महाविकास आघाडीचे फटाके फुटतील, असा दावा देखील खडसे यांनी केला आहे. रोहिणी खडसे यांचा ज्या कारणांमुळे गेल्या निवडणुकीत पराभव झाला होता, ती कारणे आम्ही शोधली आहेत. त्यामुळे यावेळी त्यांचा विजय नक्की असल्याचे खडसे यांनी म्हटले आहे.

# अजित पवारांना फडणवीसांनी ब्लॅकमेल केले : जयंत पाटील

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अजित पवारांना ब्लॅकमेल करण्याचा गंभीर आरोप केला आहे. या प्रकरणी त्यांनी अजित पवारांनी सिंचन घोटाळ्याप्रकरणी दिवंगत आर. आर. पाटील यांच्यावर केलेल्या आरोपांचा दाखला दिला आहे.

७० हजार कोटींच्या कथित सिंचन घोटाळ्याची खुली चौकशी करण्याच्या फाईलवर दिवंगत माजी गृहमंत्री आर आर पाटील यांनी स्वाक्षरी केली होती. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही गोष्ट आपल्या निदर्शनास आणून दिली होती, असे विधान अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. जयंत पाटील यांनी एका इंग्रजी वृत्तपत्राशी बोलताना अजित पवारांच्या या विधानाद्वारे देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना ब्लॅकमेल करत होते हे सिद्ध होते असा दावा केला आहे.

जयंत पाटील म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत कलह वाढवण्याचे प्रयत्न गत अनेक वर्षांपासून सुरू होते हे अजित पवारांच्या वक्तव्यावरून दिसून येते. इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या विशेष मुलाखतीत जयंत पाटील म्हणाले, तुम्ही (फडणवीस) विरोधी पक्षात असताना अजित पवारांवर आरोप केले. सत्तेत आल्यानंतर त्यांची चौकशी केली आणि आर. आर. पाटील यांच्यावर आरोप करणारी फाइल त्यांना दाखवली. म्हणजे तेव्हापासून आमच्या पक्षातील अंतर्गत कलहाला खतपाणी घालण्याचे प्रयत्न सुरू होते. अजित पवारांना ही फाईल दाखवून तब्बल १० वर्षे ब्लॅकमेल करण्यात आले. यावरून ते भाजपमध्ये जाण्यास का उत्सुक होते हे स्पष्ट होते. अजित पवारांना ब्लॅकमेल करण्यात आले हे स्पष्ट आहे.

जयंत पाटील म्हणाले, अजित पवारांच्या वक्तव्यामुळे देवेंद्र फडणवीस यांची कार्यशैली उघड झाली. यामुळे ते मोठ्या संकटात सापडलेत. ते म्हणाले, मला वाटते की ते (अजित पवार) स्वतः यामुळे घेरले गेले आहेत. पण त्यांनी असे विधान करून देवेंद्र फडणवीस यांना आणखी अडचणीत आणले. कारण, यातून फडणवीस यांची कार्यशैली तसेच गेल्या १० वर्षांतील त्यांच्यातील संबंधही समोर आले. त्यांनी ती फाईल विरोधी पक्षनेत्यांना दाखवली असती तर मला समजले असते. पण ते (अजित पवार) त्यावेळी केवळ एक विरोधी पक्षाचे आमदार होते.

अजित पवारांनी २९ ऑक्टोबर रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव विधानसभा मतदारसंघातील एका प्रचारसभेला संबोधित केले. त्यात ते म्हणाले होते की, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपचा विजय झाला. त्यानंतर मुख्यमंत्री झालेल्या देवेंद्र फडणवीस यांनी मला आर.आर. पाटील यांनी सही केलेली एक फाईल दाखवली. या फाईलमध्ये ७० हजार कोटींच्या कथित सिंचन घोटाळ्याप्रकरणी माझी खुली चौकशी करण्याचा उल्लेख होता.

जयंत पाटील पुढे बोलताना म्हणाले, जो स्वतःचा बचाव करू शकत नाही अशा व्यक्तीविरोधात बोलणे साफ चुकीचे आहे. आम्ही त्यांच्यासोबत गेलो नाही, यावरून ते आमच्यावर टीका करू शकतात. पण पक्षात जेव्हा फूट पडली तेव्हा आर. आर. पाटील हयात नव्हते. ते त्यांचे नाव कसे ओढू शकतात? तब्बल ९ वर्षांनंतर का? यावरून अजित पवार कोणत्याही व्यक्तीविरोधात काहीही बोलू शकतात हे स्पष्ट होते.

# राज ठाकरेंनी आपला पक्ष बंद करावा : रामदास आठवले



**मुंबई** : रामदास आठवलेंसारखे मंत्री व्हायचे झाल्यास मी माझा पक्ष बंद करेन, असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एका कार्यक्रमात म्हणाले होते. त्यांच्या विधानावर रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया देत मी आता मंत्री आहे, त्यामुळे त्यांनी पक्ष बंद करावा, असा पलटवार राज ठाकरे यांच्यावर केला आहे. राज ठाकरे एका पक्षाचे नेते आहेत. मी कधी त्यांच्या विरोधात बोलत नाही. मी पँथर काळापासून संघर्ष केल्यामुळे मला मंत्रिपद मिळाले आहे. माझा गरिबांचा पक्ष आहे. आता मी मंत्री झालो आहे, तर राज ठाकरेंनी त्यांचा पक्ष बंद करावा, असे ते म्हणाले.